पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३१००                दि. २६ /०९ /२०१९**

## वानवडी पोलीस स्टेशन

## पुरात बुडलेला चारचाकी वाहनातील दामपत्याचा व बालकाचा वानवडी पोलीसांनी वाचावला जिव

दिनांक २५/०९/२०१९ रोजी नियंत्रण कक्ष येथुन वानवडी बाजार बिट मार्शल यांना रात्रौ २३/३० वा सुमारास फोन आला की,गंगा सॅटेलाईट सोसायटीत पाणी शिरले असुन ओढयाला पुर आलेला आहे.तरी तुम्ही त्या ठिकाणी जा.त्यावेळी सदर ठिकाणी वानवडी बाजार बिट मार्शलचे पोलीस शिपाई बडे,पोलीस शिपाई कसबे यांनी सदरची गोष्ट वरिष्ठांना कळवले तसेच फायरबिग्रेडला कळवुन लागलीच घटनास्थळी जावुन ओढयाच्या बाजुला जाणारी वाहतुक थांबवुन सदर ठिकाणी बॅरीकेट लावुन लोकांना तेथे जाण्या येण्यास मज्जाव केला.त्यानतंर त्यांच्या असे निर्दशनास आले की,एक वॅगनार हि चार चाकी गाडी पाण्याच्या प्रवाहा बरोबर वाहात जात असल्याचे दिसत आसल्याने नमुद कर्मचारी यांनी लोकाच्या मदतीने सदर गाडी पाण्याच्या बाहेर काढुन त्यामधील ड्रायव्हीग करणारे इसमाचा जिव वाचावला त्यानंतर त्याना पाण्यामध्ये अर्ध्या बुडालेल्या टेम्पो मधुन आरडा ओराडा झाल्याचा आवाज आला.म्हणुन त्यांनी तेथे उपलब्ध असलेल्या दोराच्या सह्याने टेम्पो पर्यत जावुन टेम्पो मधील इसम नामे नितीन भिकाजी पवार वय-३५ वर्षे व त्याची पत्नी शंकुतला व त्यांची ४ वर्षाची लहाण मुलगी शितल यांना जिव धोक्यात घालुन पाण्याचे बाहेर काढले .४ वर्षाचा लहाण मुलगी शितल कासावीस होवुन तीला ग्लानी आल्याने सदर कर्मचारी यांनी हॉस्पीटल येथे ॲडमिट केले.त्यांनतर मुलीची तब्येत स्थिर झाल्यावर मुलीच्या आई वडिलांनी त्याचे गाडी मध्ये एक पिशवी मध्ये सोन्याचे दागिने गाडीत असल्याचे नमुद पोलीसांना सागितले.पोलीस शिपाई बडे व पोलीस शिपाई कसबे यांनी पुन्हा टेम्पो जवळ दोरीच्या सह्याने पाण्यामध्ये जावुन टेम्पोतील सोन्याच्या दागिनाची पिशवी बाहेर काढली त्यामध्ये सोन्याचे मंगलसुत्र,कर्णफुले,काळीपोत इत्यादी किंमत रुपये ८०,०००/- चे दागिने सदर दाम्पत्याकडे सुपुर्द केले. दाम्पत्याने पोलीसांना देवाच्या रुपाने धावुन आल्याचे सांगुन साश्रु नयनांनी आभार मानले.